**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/पुवि/लो.सा.निवडणूक-मतदार नोंदणी अभियान/२०२४/5488 दि. १२/०४/२०२४

**अतितातडीचे / महत्वाचे / लोकसभा सा. निवडणूक**

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे जिल्हा,
३. प्राचार्य / प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित / कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे जिल्हा.**

विषय - **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४..**
**युवकांसाठी विशेष मतदार नोंदणी अभियान राबविणेबाबत..**
**(३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून)**

संदर्भ - १. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे पत्र क्र. उभूसंक्र.१३/आस्था-१/कावि/१०७/२०२४ दि. ११.४.२०२४.

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित पत्रांच्या विषयानुषंगाने कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाचे निरीक्षक यांनी दिनांक १०.०४.२०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये पुणे जिल्हयातील मतदार यादीमध्ये **१८ ते १९ व २० ते २९ वयोगटातील युवा मतदार यांची नोंदणी अल्प प्रमाणात असल्याने त्यांची नोंदणी करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.**

त्या अनुषंगाने पुणे जिल्हयातील **(३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून)** सर्व महाविद्यालयांमध्ये **दिनांक १२.०४.२०२४ ते १५.०४.२०२४** या कालावधीमध्ये युवा मतदार नोंदणी अभियान राबविण्यात यावे. मतदार नोंदणी अर्ज हे ऑनलाईन स्वरुपात देखील भरता येणार असून हे अर्ज https://voters.eci.gov.in या लिंकवरुन भरता येणार आहेत. तसेच Voter Search Helpline App द्वारे देखील भरता येणार आहेत. सदर ॲप मोबाईलवर Play Store वरुन डाऊनलोड करता येणार आहे. मतदार नोंदणीसाठी रहीवासी पुरावा म्हणून लाईट बिल/पाणी पटटी बिल, आधारकार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पासबुक, भारतीय पारपत्र (Passport)] नोंदणीकृत विक्रीखतम नोदणीकृत भाडे करार, वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्य शिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे जोडण्यात यावीत.

सदर विशेष मतदार नोंदणी अभियानाबाबत महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना एसएमएस, whatsapp group तसेच आपल्या संकेतस्थळाद्वारे माहिती देण्यात यावी.

विशेष मतदार नोंदणी अभियानामध्ये होणा-या नव युवा मतदार नोदणीचा दैनंदिन अहवाल खालील नमुन्यात slaopune13@gmail.com या मेलवर सादर करण्यात यावा व सदर अभियान दिनांक १५.०४.२०२४ पर्यंतच राबविण्याची दक्षता घेण्यात यावी तसेच सदर नोंदणी झालेल्या मतदारांची संख्या https://forms.gle/W5UCYCNnpCGvV6SeA या गुगल लिंकवर दिनांक १२,१३,१४ व १५ एप्रिल, २०२४ रोजीची दररोज भरण्यात यावी. सदर अभियान हे पुणे जिल्हयातील **(३५ लोकसभा मतदार संघातील**

**१९९ दौंड, २०० इंदापूर, २०१ बारामती, २०२ पुरंदर, २०३ भोर, २११ खडकवासला या क्षेत्रातील महाविद्यालयांनी सदर विशेष युवा मतदार नोंदणी अभियान राबवू नये याची नोंद घ्यावी)**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | दिनांक | केलेली मतदार नोंदणी संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | १८ ते २९ वयोगट | २० ते २९ वयोगट |
| | | | | |

**(डॉ.केशव तुपे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे.
प्रत - मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांना माहितीस्तव सादर.

SWEEP

उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बि विंग, पुणे - १
इमेल आयडी - slaopune१३@gmail.com

दिनांक -११ /४/२०२४

क्र. उभूसंक्र. १३/आस्था-१/कावि/१०७ /२०२४

<u>निवडणूक तात्काळ</u>

प्रति,
१. कुलगुरू
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे
पुणे ४११००१
३. विभागीय सहसंचालक तंत्र शिक्षण,
पुणे विभाग, पुणे
पुणे ४११००१
४. शिक्षण अधिकारी
जिल्हा परिषद,पुणे-०१
५. शिक्षण अधिकारी
पुणे महानगरपालिका, पुणे – ०५
६. शिक्षण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

**विषय:- <u>लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४</u>**
**युवकांसाठी विशेष मतदार नोंदणी अभियान राबविणेबाबत**
**(३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून).**

मा. भारत निवडणूक आयोगाचे निरीक्षक यांनी दि. १०/०४/२०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये पुणे जिल्ह्यातील मतदार यादीमध्ये १८ ते १९ व २० ते २९ वयोगटातील युवा मतदार यांची नोंदणी अल्प प्रमाणात असल्याने त्यांची नोंदणी करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील **(३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून)** सर्व महाविद्यालयांमध्ये **दि. १२/०४/२०२४ ते १५/०४/२०२४ या कालावधीमध्ये** युवा मतदार नोंदणी अभियान राबविण्यात यावे. मतदार नोंदणी अर्ज हे ऑनलाईन स्वरुपात देखील भरता येणार असून हे अर्ज https://voters.eci.gov.in या लिंकवरून या लिंकवरून भरता येणार आहेत. तसेच Voter Search Helpline App द्वारे देखील भरता येणार आहेत. सदर अप मोबाईलवर play store वरून डाउनलोड करता येणार आहे. मतदार नोंदणीसाठी रहिवासी पुरावा म्हणून लाईट बिल/पाणी पट्टी बिल, आधारकार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पासबुक, भारतीय पारपत्र (Passport), नोंदणीकृत विक्रीखतम नोंदणीकृत भाडे करार, वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्य शिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे जोडण्यात यावीत.

सदर विशेष मतदार नोंदणी अभियानाबाबत महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना एसएमएस, whatsapp group तसेच आपल्या संकेतस्थळाद्वारे माहिती देण्यात यावी.

विशेष मतदार नोंदणी अभियानामध्ये होणाऱ्या नव युवा मतदार नोंदणीचा दैनंदिन अहवाल खालील नमुन्यात इकडील कार्यालयास slaopune13@gmail.com या ई-मेल वर सादर करण्यात यावा.तसेच सदर अभियान **दि. १५/०४/२०२४ पर्यंतच** राबविण्याची दक्षता घेण्यात यावी.

| अ.क्र. | दिनांक | केलेली मतदार नोंदणी संख्या | |
|---|---|---|---|
| | | १८-१९ वयोगट | २०-२९ वयोगट |
| | | | |

(डॉ. सुहास दिवसे) ११/४
जिल्हाधिकारी, तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत:-

१) उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांना माहितीसाठी

२) मतदार नोंदणी अधिकारी व सहा.मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सदर उपक्रमाचे राबविताना आपले मतदार संघातील सर्व महाविद्यालयांशी समन्वय साधून उपक्रमांचे आयोजन करताना मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून कामकाज पाहावे. **(३५ लोकसभा मतदार संघातील १९९ दौंड, २०० इंदापूर,२०१ बारामती, २०२ पुरंदर, २०३ भोर, २११ खडकवासला यांनी सदर विशेष युवा मतदार नोंदणी अभियान राबवू नये याची नोंद घ्यावी.)**